# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

शिक्षणाचा अधिकार

सर्व शिक्षा अभियान

सारे शिकूया, पुढे जाऊया

जा.क्र. :– 365 / शि.वि. / सशिअ.  दिनांक – 12 / 11 / 2014

प्रति,

सर्व मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका
प्राथ. / उच्च प्राथ / माध्य. शाळा
म.न.पा. नागपूर

विषय :– शाळा व्यवस्थापन समिती U-DISE सन 2013–14.

संदर्भ :– 1) म.प्रा.शि.प. मुंबई यांचे पत्र क्र. 4910, दि. 02 डिसेंबर, 2013.
2) क्र. मप्राशिप. / सशिअ / प्रमा / 2014–15 / 4070, दि. 10 नोव्हेंबर 2014.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, सन 2013–14 च्या U-DISE डाटावरून शाळा व्यवस्थापन समिती स्थापन करण्याबाबत कार्यवाही संदर्भात कळविण्यात येते की, आजपर्यंत आपल्या शाळेमध्ये अद्यापही शाळा व्यवस्थापन समितीची स्थापना झालेली नसल्यास, RTE Act 2009 या कायदयानुसार प्रत्येक शाळेत शाळा व्यवस्थापन समितीची सथापना करणे अनिवार्य आहे. त्यानूसार अशा शाळांची स्थापना करण्यासाठी तातडीची बैठक घेऊन प्रत्येक शाळेत शाळा व्यवस्थापन समितीची स्थापना करावी. तसेच शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांमध्ये सरासरी 50% महिलांचा समावेश होईल या दृष्टीने आपल्या स्तरावरून कार्यवाही करावी. तसेच शाळा व्यवस्थापन समितीची सभा महिन्यातून एकदा होईल अशी दक्षता घ्यावी व प्रत्येक शाळेत शाळा विकास आराखडा तयार करणे आवश्यक आहे. प्रत्येक शाळा व्यवस्थापन समितीला प्राप्त झालेला निधी व केलेला खर्च याबाबतच्या सर्व नोंदी ठेवाव्यात व तसा अहवाल या कार्यालयाला उलट टपाली सादर करावा.

-sd-
शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका नागपूर

प्रतिलिपी : सविनय माहितीस्तव सादर :–

1. मा. सह संचालक, (गुणवत्ता) मप्राशिप, मुंबई.
2. मा. उपायुक्त, नागपूर महानगरपालिका नागपूर.
3. सहा. शिक्षणाधिकारी, मनपा. नागपूर
4. शहर साधन समन्वयक, ................................ मनपा. नागपूर

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका नागपूर

E:\Rahul\2014-15\UDISE\Letter